


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार १७ जानेवारी २०२५ | अंक ३९ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.


बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


## दर १२ वर्षांनी होतो एकदा कुंभमेळा

# नशिबवान पिढीच्या नशिबात महाकुंभमेळा! १४४ वर्षांनी योग



जगातला सर्वात मोठा धार्मिक सोहळा प्रयागराजच्या संगमावर सुरु आहे. महाकुंभमेळ्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात एक अख्खं शहर वसवलं गेलंय. गंगा पार करण्यासाठी तात्पुरते ३० पूल उभारण्यात आले आहेत. ४ हजार हेक्टर जमिनीवर महाकुंभचा मेळा आयोजित झालाय. १३ हजार विशेष रेल्वे गाड्या, लाखोंचा फौजफाटा कुंभनगरीत तैनात आहे. तब्बल १५ हजार कोटींचं बजेट तरतूद केलं गेलंय. कारण या महाकुंभ मेळ्यात स्नानासाठी तब्बल ४० कोटी लोक येण्याचा अंदाज आहे, म्हणजे महासत्ता अमेरिकेची जितकी लोकसंख्या नाही, त्याहून जास्त लोक प्रयागराजमधल्या महाकुंभनगरीत स्नान करणार आहेत. महाकुंभमेळ्याचं महत्व काय, तो कशासाठी आणि दर १२ वर्षांनीच का भरतो? ते समजून घेऊयात. हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार, कुंभमेळा समुद्रमंथनाशी संबंधित आहे. समुद्रमंथनातून निघालेला अमृत कलश मिळवण्यासाठी देव आणि दानवांमध्ये युद्ध झालं. तब्बल १२ दिवस हे युद्ध चाललं. मान्यतेनुसार देवाधिकांचे १ दिवस हे मानवांसाठी १ वर्षाबरोबर आहेत. म्हणून दर १२ वर्षांनी एकदा कुंभमेळा होतो. देव-दानवांच्या युद्धावेळी अमृत कलशातून ४ थेंब पृथ्वीच्या ज्या भागावर पडले, त्याच चार ठिकाणी कुंभमेळा भरतो. ती चार ठिकाणं म्हणजे प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि आपलं नाशिक! यंदाचा महाकुंभमेळा विशेष का? यंदाचा महाकुंभमेळा विशेष का? त्यासाठी इतके कोट्यवधी लोक स्नानासाठी का पोहोचत आहेत? कारण, यंदाचा मेळा हा महाकुंभमेळा आहे. जो दर १२ वर्षांनी नव्हे तर ग्रह-ता-यांच्या दुर्मिळ स्थितीनुसार तब्बल १४४ वर्षांनी एकदा येतो. म्हणजे याआधीचा महाकुंभमेळा हा १८८१ च्या दरम्यान होता आणि यानंतरचा महाकुंभमेळा सन २१६९ ला होईल. जर तुम्ही पस्तीशीत असाल तर याआधीच्या महाकुंभमेळ्याला तुमच्या आजोबाचांही जन्म झाला नसेल, आणि यापुढच्या महाकुंभमेळ्याला आपले नातू देखील हयात नसतील कुंभमेळ्यासाठी जे तात्पुरत्या स्वरुपात टेंटचं शहर उभारण्यात आलंय, ते याच अरैल भागात आहे. इथं निवासाचीही व्यवस्था करण्यात आलीय. फक्त विभागच नव्हे तर साधू-संत, सर्वसामान्य लोक, प्रशासनाचे अधिकारी अशा सर्व लोकांना सेक्टरमध्ये वाटण्यात आलंय. यमुना नदी आणि गंगा नदी या दोन्ही नद्यांचं याठिकाणी संगम होतं, त्याच स्थळावर जवळपास ४० कोटी लोक स्नानासाठी येण्याचा अंदाज आहे. कुंभमेळ्याचे एकूण ४ प्रकार धारणेनुसार कुंभमेळ्यावेळी पवित्र असणा-या गंगा-यमुना आणि सरस्वती नदीच्या संगमस्थळी डुबकी मारल्यास मोक्षाची प्राप्ती होते. फक्त भारतातूनच नव्हे तर जगभरातून हिंदू धमला मानणारे अनेक लोक प्रयागनगरीत दाखल झाले आहेत. कुंभमेळ्याचे एकूण ४ प्रकार आहेत. कुंभमेळा हा दर ४ वर्षांनी एकदा होतो. अर्ध कुंभ मेळा दर ६ वर्षातून एकदा, पूर्ण कुंभमेळा १२ वर्षांतून एकदा आणि यंदा भरलेला महाकुंभमेळा

## महाकुंभ मेळाव्यात नियोजन कसं?

गर्दीच्या नियोजनासाठी कुंभमेळा नगरीत ५ भाग तयार करण्यात आले आहेत. पहिल्या परेड ग्राऊंड विभागात १ ते ५ सेक्टर आहेत, फाफामऊ भागात १० ते ६ सेक्टर. झुंसी उत्तर विभागात ११ ते १९, झुंसी दक्षिणेत २० ते २२ आणि अरैलमध्ये २३ ते २५ सेक्टर अशी विभागणी केली गेलीय. फाफामऊ भागातून प्रतापगड, सुलतानपूरसह वरच्या राज्यातून आलेल्या लोकांना प्रवेश आहे. झुंसी उत्तरेत बनारस, जौनपूरसहीत बिहार भागाकडेच्या लोकांना प्रवेश देण्यात येईल. झुंसी दक्षिणचे ३ सेक्टर सारे साधू-संत, त्यांचे आखाडे यांच्यासाठी बनवण्यात आले आहेत. प्रयागराज शहरासहीत कानपूरकडच्या भागातले लोकांना परेड ग्राऊंड भागातून मेळ्यापर्यंत जाता येईल. अरैल भागातून चित्रकूट, मध्य प्रदेशसह इतर राज्यातल्या लोकांचा प्रवेश होईल.

## त्या पलाडक्या बहिणींना जानेवारीचे पैसे भेटणार नाहीत



ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे. अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. गेल्या वर्षी जुलै महिन्यात ही योजना सुरू करण्यात आली होती. डिसेंबरपर्यंतचे हाप्ते लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. आता सर्वांचं लक्ष लागलं आहे ते म्हणजे जानेवारीचा हाप्ता कधी मिळणार त्याकडे. त्यासोबतच २१०० रुपयांचा हाप्ता कधीपासून मिळणार असाही प्रश्न अनेकांच्या मनात आहे. आता या योजनेबाबत मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून मोठी अपडेट देण्यात आली आहे.नेमकं काय म्हणाल्या तटकरे? डिसेंबरचा हाप्ता लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. आता २६ जानेवारीपर्यंत महिलांना जानेवारी महिन्याचा हाप्ता देखील मिळणार आहे. येत्या तीन ते चार दिवसांमध्ये पैसे बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात होईल. ही योजना सुरूच राहणार आहे, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. दरम्यान आमचं सरकार आल्यानंतर आम्ही लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देऊ असं अश्वासन महायुतीच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी दिलं होतं. त्यामुळे आता २१०० रुपये कधीपासून मिळणार असा प्रश्न देखील आता विचारला जात आहे यावर देखील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.या आधी यावर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात आणि त्यानंतरच्या काळात यावर सकारात्माक विचार होणार आहे,

## पुस्तकाचे गुण दोषासह मूल्यमापन म्हणजेच पुस्तक परिक्षण होय. डॉ. सुदर्शन अवस्थी.



चौसाळा - पुस्तक परिक्षण हा साहित्य आणि समीक्षा व्यवहारातील महत्वाचा भाग असतो. पुस्तकाचा परिचय करून देण्याचे काम परिक्षण करत असते. लेखन कलाकृतीचे गुणदोषासह मूल्यमापन करणे म्हणजे पुस्तक परिक्षण आहे असे मत प्रा. डॉ. सुदर्शन अवस्थी यांनी व्यक्त केले. कला व विज्ञान महविद्यालय चौसाळा येथे ङ्कस्कुल कनेक्ट ङ्क संपर्क अभियांना अंतर्गत ग्रंथालय विभागातर्फे आयोजित पुस्तक परिक्षण व कथन या कार्यक्रमात ते बोलत होते पुढे बोलताना डॉ. अवस्थी यांनी इग्रजी साहित्यातील अनेक चांगल्या पुस्तकाचा परिचय करून दिला. अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. विलास भिल्लारे यांनी विध्यार्थ्यांना पुस्तकप्रेमी बना असा सल्ला दिला. यावेळी प्रा. अमर आलदे, प्रा. सुधीर माने यांनी पुस्तक परीक्षणाचे व कथनाचे महत्व व्यक्त केले. या वेळी ग्रंथपाल डॉ. पंढरीनाथ हिरवे यांनी प्रास्ताविक करताना वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियानाचा उद्देश विषद केला. या प्रसंगी व्यासपीठावर उप प्राचार्य प्रा. चांगदेव शेळके, पदव्युत्तर संचालक डॉ. सुधाकर वणवे , कमवि चे उप प्राचार्य प्रा. गणपती ढवळशंख उपस्थित होते. शेवटी आभार डॉ. देशमुख सर. यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. संजय कदम, श्री. बबन घोडके, डॉ.परमेश्वर वाणी, प्रा. प्रकाश गायकवाड , श्री. अमर खोसे, प्रा. ओम चाळक यांच्या सह विद्यार्थी बहुसंखेने उपस्थित होते.

## देवगाव येथील अंगणवाडी व आशा वर्कर्स यांच्या वतीने हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न



केज/प्रतिनिधी:-केज तालुक्यातील देवगाव येथील अंगणवाडी सेविका मदतनीस व आशा स्वयंसेवीका यांच्या वतीने मकरसंक्रांती निमित्त हाळदी कुंकूवाचा कार्यक्रम गुरुवार दिनांक १६रोजी देवगाव येथील हानुमान मंदिर येथे संपन्न झाला या वेळी गावातील बहुतांश महिला सहभागी झाल्या होत्या उपस्थित महिलांचे पुष्पहार देऊन येथोचित सन्मान करण्यात आला या कार्यक्रमांसाठी, अंगणवाडी सेविका, आशाताई घुले, वैशालीताई नागरगोजे, सिंधुताई मुंडे, मदतनीस, कुंदाताई गायकवाड,ताई नागरगोजे,राहीबाई गिरी आशा सेविका आल्काताई मुंडे, आशाताई मुंडे यांच्यासह दैवशाला मुंडे यांची उपस्थिती होती

## किल्ले धारूर शहरांमध्ये स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी राजे यांचा राज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहामध्ये पार पडला.



किल्ले धारूर शहरांमध्ये स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी राजे यांचा राज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहामध्ये पार पडला. या राज्याभिषेक सोहळ्यासाठी धारूर शहरातील सर्व जाती-धर्माचे शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती संभाजी राजे यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून सर्व उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले तसेच स्वराज्याच्या धाकल्या धन्याचे म्हणजेच संभाजी राजे यांच्या पराक्रमाला या ठिकाणी उजाळा देण्यात आला. ज्याप्रमाणे छत्रपती संभाजी राजे कायद्याचे गाढे अभ्यासक होते तसेच त्यांना विविध विषयाचे ज्ञान होते त्याचप्रमाणे आजच्या पिढीने देखील त्यांचे गुण आत्मसात करून स्वतःचा सर्वांगीण विकास करावा असे प्रतिपादन करण्यात आले. यावेळी युवक मोठ्या संख्येने या राज्याभिषेक सोहळ्याला उपस्थित होते.

## बारामतीच्या धरतीवर परळीचा विकास करणार म्हणून बारा तेरा वर्षे भावानं थापा मारून काढले आता बहिणीची घोषणा

### बारामतीच्या विकासाचे फक्त गोडवे गायचे आणि परळीला भकास करयाचे काम बहीण भाऊ मिळून करत आहेत तालुकाध्यक्ष देवराव लुगडे



परळी (वार्ताहर) बारामतीच्या धर्तीवर परळीचा विकास करणार हे मागच्या बारा-तेरा वर्षांपासून भाऊ बोलून बोलून थकले आता बहिणीने घोषणा केली बारामती सारखा परळीचा विकास करणार पण हे ऐकून ऐकून आमचे कान बहिरे व्हायची वेळ आली बारकी पोरं तरुण झाले तरुण म्हातारे झाले विकास तर झालाच नाही पण परळी भकास करण्याचं काम दोघांनी मिळून केलं असल्याचा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी केला. महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वात विकसशील कामं कोणी केले असतील तर ते पद्मविभूषण खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांनी केलेली आहेत खरं विकासाच राजकारण काय असतं हे बारामती मध्ये गेल्यानंतर कळतं पण मागच्या ३५ वर्षापासून परळीच्या भागातील सर्वसत्ता ही मुंडे घराण्याच्या हातात आहेत पण या लोकांनी परळीचा विकास करण्याचं सोडून फक्त भकास करण्याचं काम केलं आहे.या भागात चांगल्या दर्जाची पूर्वीची व्यापार बाजारपेठ, दळणवळण, शिक्षणक्षेत्र हे सुद्धा संपवण्याचे काम यांनी केले भावानी ओरडून ओरडून फक्त सतत भाषणांमध्ये घोषणावर घोषणा केल्या की बारामतीच्या धर्तीवर परळीचा विकास करणार पण तो विकास कुठेच झाला नाही आता भावा नंतर बहीण पुढे सरसावल्या असून बहिणीने आज घोषणा केली की बारामतीचा सर्वांगीण विकास बघून यासारखा विकास परळी मध्ये करायचा आहे पण मागच्या दहा वर्षात बहिण भाऊ मिळून सत्तेत असून यांचं एकही विकासात्मक पाऊल परळीच्या भागासाठी पडलेलं दिसलं नाही यापुढे बहिण भावांनी मिळून दोघांनाही मंत्रीपद आहेत आता फक्त थापा मारायच्या सोडून परळीच्या भागासाठी विकासात्मक उपाययोजना उद्योग व्यवसाय आणावेत अशी परळी मतदारसंघातील लोकांची अपेक्षा असून ते करतील असा विश्वास वाटत नाही पण विश्वास ठेवावा लागेल फक्त बोलाची कधी बोलाचा भात करू नका एवढीच अपेक्षा तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी व्यक्त केली.

# मराठी पत्रकार परिषदेच्या तीन शिलेदारांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार!

**पत्रकार सचिन पवार, संजय सानप, अनिल गायकवाड यांच्या लेखणीचा सन्मान! पुणे ते सेलू पत्रकार एकता रॅलीचे पाटोद्यात होणार जंगी स्वागत**

पाटोदा प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मराठी पत्रकार परिषदेचे शिलेदार पत्रकार सचिन पवार, पत्रकार संजय सानप, पत्रकार अनिल गायकवाड उत्कृष्ट लेखणीबद्दल दर्पण दिनानिमित्त विविध संस्थेकडून पुरस्कार मिळाले आहेत. मराठी पत्रकार परिषद पाटोदा तालुक्याच्या वतीने या तीनही शिल्यादारांचा पाटोदा येथील शासकीय विश्रामगृह येथे सत्कार करण्यात आला. अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रामध्ये काम करत असलेले पत्रकार सचिन पवार यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था नाशिक त्यांच्याकडून दिला जाणारा राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार मिळाला तसेच पत्रकार संजय सानप यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई यांच्याकडून दिला जाणारा दर्पण पुरस्कार मिळाला. तसेच पत्रकार अनिल गायकवाड यांना ठाणे येथील साहित्यिक साहित्य वारी या दैनिकाचा पुरस्कार मिळाला आहे. या मराठी पत्रकार परिषदेच्या पत्रकारांनी अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केला आहे. अनेक पुरस्कारही



प्राप्त झाले आहे. यावर्षी या तिघांनाही पुरस्कार मिळाल्याने मराठी पत्रकार परिषदेकडून तिघांचाही सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यांचा ज्येष्ठ पत्रकार छगनराव मुळे, इद्रिस चाऊस, कादर मकरानी, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सत्कार संपन्न झाला, यावेळी पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजू भैया जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष अजय जोशी, काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना तालुका अध्यक्ष मुकुंद शिंदे,अक्षय कांकरिया, ज्येष्ठ पत्रकार दयानंद सोनवणे, हमीद पठाण, अशोक भवर, जावेद शेख, हरिदास शेलार, नानासाहेब डिडुळ, दत्ता देशमाने, सतीश गर्जे, फयाज शेख, दिगंबर नाईकनवरे, सचिन शिंदे यांच्यासह अनेक पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेलू येथे होणा-या कार्यक्रमाचे देखील केलं नियोजन

सेलू जिल्हा परभणी येथे एक फेब्रुवारी २०२५ रोजी होणा-या आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि तालुका अध्यक्षांचा मेळावा हा मोठ्या उत्साहात होणार आहे त्याच अनुषंगाने पुणे ते सेलू पत्रकार एकता रॅली पाटोदा नगरीत येणार आहे त्या अनुषंगाने देखील आज कार्यक्रम संपल्यानंतर नियोजन करण्यात आले पत्रिका आल्यानंतर सविस्तर आढावा घेऊन पत्रकार एकता रॅलीच जंगी स्वागत पाटोदा शहरांमध्ये केलं जाणार असल्याची माहिती देखील मिळाली आहे.

## सन्मान लेखणीचा!

मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून लेखणीची व सामाजिक चळवळ सुरू ठेवणारे पत्रकार सचिन पवार, संजय सानप, अनिल गायकवाड यांना तीन वेगवेगळ्या संस्थांकडून पुरस्कार प्राप्त झाले आहे त्याबद्दल मराठी पत्रकार परिषदेकडून त्यांचा आज जाहीर सत्कार करण्यात आला तसेच पाटोदा तालुक्यातील विविध पक्ष संघटनेच्या पदाधिका-याकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव देखील करण्यात आला.

## दर्पण दिनाचे औचित्य साधून सर्व पत्रकार सन्मानित!

दर्पण दिन ६ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात राज्यभरामध्ये साजरा केला जातो या दिवशी सर्व पत्रकारांना सन्मानित केल्या जातं आणि शुभेच्छा ही दिल्या जातात त्यातच औचित्य साधून मराठी पत्रकार परिषदेकडून यावर्षी सर्व पत्रकारांना सन्मानचिन्ह आणि ओळखपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तो कार्यक्रमही आज घेण्यात आला.

बीड/महाराष्ट्र

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार १७ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

### पायंडा पडतो आहे,जाती साठी माती

--खरं तर लिंग, जात, धर्म, भाषा, देश हे काही आपल्याला, आपल्या चॉइसनुसार मिळालेले नसतात. तरीही ते माणसाच्या दुराभिमानाचे विषय बनतात. बनतात तर बनतात, पण या प्रत्येकाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी, माणसाने काहीना काही त्याग केला पाहिजे, असं त्याच्यावर सतत बिंबवलं जातं. ज्या गोष्टी आपल्याला, आपल्या पसंती वा मर्जीनुसार मिळाल्या नाहीत, त्यांचं आपल्यावर ऋण ते कसं? असा साधा विचारही आपल्या डोक्यात येत नाही.जातीचं ऋण फेडण्यासाठी तर, माणसाने माती खाल्ली पाहिजे, असं म्हटलं जातं. त्यावरुनच मजातीसाठी माती खाणेफ, हा वाक्यप्रचार रुढ झाला. नुसता रुढ झाला नाही, तर मेंदूवर आरुढ झाला. खरंच जातीइतकी माती, माणसाची इतर कोणत्याही गोष्टीने केली नाही. जातीचं राजकीय मूल्य जितकं जास्त, तितकी माती खाणा-यांची संख्याही जास्त. अशी माती खाणारी माणसं पाहिली की मती गुंग होते.ज्याकाळी रोटीबेटी व्यवहाराची आणि व्यवसायाची, जातीय बंधनं काटेकोर होती. त्या काळात जातीसाठी माती खाणे समजू शकतो. पण आज व्यवसाय स्वातंत्र्यामुळे व्यवसायांचा जातीशी, तसा काटेकोर संबंध राहिला नाही. रोटीव्यवहाराचं बंधनही आता उरलं नाही. जातपंचायतींना मूठमाती मिळाली आहे. एक बेटीव्यवहारा पुरता काय तो, जातीशी व्यक्तीचा संबंध उरला आहे. आंतरजातीय विवाहांमुळे, जातींसंस्थेच्या त्या बुरुजालाही हादरे बसू लागले आहेत. अशाप्रकारे जातीची वाटचाल, मआयसीयूफच्या दिशेने सुरु आहे. पण तसतसा तिचा उमाळा मात्र वाढतो आहे, याचं नवल वाटतं. एकेकाळी श्रम- विभागणीसाठी अस्तित्वात आलेली जात, पुढे समाज-विभागणीचं प्रभावी साधन बनली. कलाकौशल्याच्या जपणुकीसाठीची ही व्यवस्था,माणुसकीला काळीमा फासणारी व्यवस्था ठरली. सेवासुविधा पुरविणारी जात, शोषणपीडणाचं साधन बनली. माणसामाणसात फूट पाडून, माणुसकीचीहत्या करणारं भयंकर हत्यार बनली.प्रत्येक जातीत तीन प्रकारची माणसं असतात. एक हात देणारे, दोन हात दाखवणारे आणि तीन हात बांधून गंमत पाहणारे. या तीन प्रकारची माणसं नाहीत, अशी एक तरी जात आहे का? वास्तविक हे तीन प्रकार म्हणजेच माणसाच्या जाती होत. ज्या जातीत फक्त मदतीचा हात देणारीच माणसं आहेत, त्यांनी जरुर जातीचा अभिमान बाळगावा नि जातीसाठी माती खावी.प्रत्येक व्यक्तीने त्याच्या वैयक्तीक जीवनात जातीचं योगदान किती? याचा हिशेब मांडला, तर लक्षात येईल की, जीवनाच्या वेगवेगळ्या वळणांवर त्याला स्वजातीपेक्षा, अन्य जातींचंच योगदान अधिक लाभलं आहे. जरा आठवून पहा. आपल्या सुखदुःखात धाऊन येणारे सगळे जातीचे होते का? आपल्या जीवनाला कलाटणी देणा-या व्यक्ती जातीच्याच होत्या का? सख्ख्या भावापेक्षा ज्यांनी आपल्यावर जास्त प्रेम केलं, ते मित्र जातीचे होते का? बिकट प्रसंगी ज्यांनी मदतीचा हात दिला, ते जातीचे होते का? दुःखाच्या प्रसंगी जे सांत्वनासाठी आले, ते जातीचे होते का? आणि शुभप्रसंगी उपस्थित राहून, ज्यांनी आपल्या कार्याची शोभा वाढवली, ते सर्व जातीचे होते काय?हात देणारे सारे जसे, जातीचे नसतात. तसेच हात दाखवणारेही सारे, परजातीचे नसतात ! समाजात वावरताना आपण भाजीवाला,किराणावाला, डॉक्टर, नर्स, ड्रायव्हर, प्लंबर, गवंडी, इलेक्ट्रीशियन इत्यादींना जात विचारतो का? या सर्वांची आपण जात पाहत नाही, तर गुणवत्ता पाहतो. जो गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान करेल, त्याची आपण निवड करतो. जीवावर बेततं तेव्हा जीव वाचवणारं रक्त कोणाचं होतं, याची आपण चौकशी करतो का? रक्त जर कोणाचंही कोणाला चालतं, तर मग जातिभेद आणि धर्मभेदाला काय अर्थ उरतो? माणसाला माणसाचंच रक्त चालतं प्राण्यांचं चालत नाही. याचा अर्थ माणसाची माणूस हीच एक जात आणि माणूसकी हा एकच धर्म आहे.भगवान बुद्धांनी तीन हजार वर्षांपूर्वी सागितले होते, मजाती प्राणी व वनस्पतीत आहेत. मनुष्यात जाती नाहीत. तरीही जातीला आपण उराशी कवटाळतो. याला काय म्हणणार ? अहो! यालाच जातीवर जाणं किंवा जातीसाठी माती खाणं म्हणतात. तरीही तिला आपण उराशी कवटाळतो. याला काय म्हणणार? अहो! यालाच जातीवर जाणं किंवा जातीसाठी माती खाणं म्हणतात. खा बाबांनो! पसंद अपनी अपनी, खयाल अपना अपना !

# राजकीय पक्षांस शिर्डीचा नवतीर्थस्थानाचा मोह पडू लागला

आपल्याकडे राजकीय तसेच अन्य सर्वच धनिकांस दोन धर्मस्थळांचा मोह आवरता आवरत नाही. एक तिरुपती येथील बालाजी आणि दुसरे शिर्डी येथील साईबाबा. अनेक उद्योजक तर या देवस्थानांस आपले व्यवसाय भागीदार बनवतात आणि नफा झाल्यास त्याचा काही वाटा त्या देवस्थानाच्या हुंडीत घातला जाईल असे नमूद करतात. अर्थात हे असले उद्योजक कोण असतात हे सांगण्याची गरज नाही आणि त्याची चर्चा करण्याचे प्रयोजन नाही. तथापि या ङ्गअसल्याफ उद्योजकांप्रमाणे राजकीय पक्षही देवदेवतांस आपले भागीदार बनवतात किंवा काय याचा शोध घ्यायला हवा. ही बाब शिर्डीस विशेष लागू होते. कारण अलीकडे अनेक राजकीय पक्षांस शिर्डी या नवतीर्थस्थानाचा मोह पडू लागला असून महाराष्ट्रातील बहुतांश राजकीय पक्षांची अधिवेशने तेथे भरताना दिसतात. कदाचित बहुतेक राजकीय पक्षांतील धनाढ्य नेते शिर्डी आणि परिसरांतून येतात हेही कारण त्यामागे नसेल असे नाही. पूजा असो वा पक्षाचे अधिवेशन. सढळ हस्ते खर्च करू शकणारा यजमान महत्त्वाचा! असे श्रीमंत यजमान शिर्डी आणि आसपासच्या दुष्काळी प्रदेशात मुबलक. असो. भाजपचे ङ्गमहाविजयी अधिवेशनफ रविवारी शिर्डी या तीर्थस्थळी पार पडले. पंचायत ते पार्लमेंट भाजपचा(च) अंमल असायला हवा, असे त्या पक्षाचे चाणक्य, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या अधिवेशनात भाजपच्या कार्यकर्त्यांस बजावले. ङ्गश्रद्धा आणि सबुरीफचे धडे देणारी संघाची दीक्षा आणि श्री साईंचे आशीर्वाद यामुळे शहा यांचे शब्द खरे ठरतील यात शंका नाही. त्यामुळे भाजपच्या भवितव्याची चिंता नाही. काळजी आहे ती भाजपच्या मित्रपक्षांची. तथापि ती करण्याआधी सहयोगी, विरोधी पक्षानेच नव्हे तर एकंदर सर्वच राजकीय पक्षांनी भाजपकडून बरेच काही शिकायला हवे. काही महत्त्वाच्या निवडणुकांआधी महासंकल्प मेळावे, निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले की महाविजयी मेळावे, तितके यश न मिळाल्यास महाचिंतन मेळावे इत्यादींचे आयोजन कसे करावे याचे धडे अन्य राजकीय पक्षांनी भाजपकडून जरूर घ्यावेत. हे असे करणे महा-महत्त्वाचे. याचे कारण यातून स्वतःच स्वतःस वा स्वतःच्या प्रत्येक कृतीस ङ्गमहाफ ठरवण्याची अंगभूत सवय लागते आणि ती जनुकीय रचनेत जाऊन बसते. असे झाले की सगळेच ङ्गमहाफ ठरते. आणि या अशा अधिवेशनांमुळे कार्यकर्ते, हौशे, गवशे आणि नवशेही व्यग्र राहतात. तसेच पक्षाच्या अर्थव्यवस्थेस चालना मिळते. निवडणूक रोख्यांतील रोख बाहेर काढण्याचा हा राजमार्ग. अर्थात तो भाजपस जितका उपलब्ध आहे तितका अन्य पक्षांस नाही, हे मान्य. पण भाजपचे हे अनुकरण त्यांनी सुरू केल्यास त्यांचाही निवडणूक रोखे मार्ग अधिक प्रशस्त आणि रुंद होऊ शकेल. असो. विषय भाजप सहयोगींच्या भवितव्याचा. तो गांभीर्याने घ्यायला हवा कारण पंचायत ते पार्लमेंट सर्वच काही भाजप स्वबळावर करू लागला तर अर्ध्या शिवसेनेचे, अर्ध्या राष्ट्रवादीचे भविष्य काय? आधीच स्वबळावर पूर्ण सत्ता नसतानाही भाजपने या अर्ध्या शिवसेनेस आणि अर्ध्या राष्ट्रवादीस महाराष्ट्रात चांगलेच चेपून टाकलेले आहे. एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांना एकेक खात्यासाठी किती घाम गाळावा लागला हे त्यांच्या ओल्या झालेल्या हातरुमालांच्या संख्येवरून लक्षात येईल. इतके करूनही शिंदे यांस गृह नाही ते नाही मिळाले आणि अजित पवारांच्या अर्ध्या राष्ट्रवादीस केंद्रीय मंत्रिमंडळापासून दूर ठेवले गेले. म्हणजे जे काही मिळाले आहे त्यातून पुढील जेमतेम चार वर्षांचीच बेगमी होणार! कारण २०२९ च्या निवडणुकांत स्वबळावर सत्ता आणली जाईल याची घोषणा खुद्द शहा यांनी केलेली आहेच. शहा यांचा शब्द! निवडणूक आयोगादी यंत्रणा तो कसा काय खाली पडू देतील? त्यामुळे भाजपची स्वबळावर सत्ता येईलच येईल. मग त्या वेळी अर्धी शिवसेना आणि अर्धी राष्ट्रवादी काय करणार? की त्या वेळी फक्त हे राज्यमंत्रीपदावरच समाधान मानणार? मानतीलही! कारण मंत्रीपदे ही या पक्षांतील अनेकांसाठी बोनसच जणू. या सर्वांस खरा आनंद आहे तो केंद्रीय तपास यंत्रणांचे जू मानेवरून उतरले याचा. ईडी-पीडा नसेल तर मंत्रीपद नाही मिळाले तरी बेहत्तर असे त्यांतील अनेकांस वाटत नसेलच असे नाही. आधी ङ्गखाल्लेलेफ पचवून घेतले जात असेल, चांगल्या तऱ्हेने अंगाशी लागणार असेल तर नव्याने (काही काळ) चार घास मिळाले नाहीत तरी हरकत नाही, असे कोणाकोणास वाटू शकते. त्यामुळे भाजप स्वबळाचे नारे देत असताना, ते प्रत्यक्षात आणत असताना त्या पक्षाच्या विजय यात्रेत आताचे आघाडी घटक पक्ष अक्षता टाकण्यात आनंद मानू शकतात. या घटक पक्षांची ही मानसिकता ठाऊक असल्याने भाजपने तरी त्यांची फिकीर का करावी? ती तो कशी करत नाही, हेच शिर्डी अधिवेशनात दिसून आले. तेव्हा भाजपचे आगामी काळातील मार्गक्रमण ङ्गयायचे तर याफ अशा आविर्भावात असेल याची दखल आघाडी पक्षांनी घेतली असावी. नपेक्षा संदर्भासाठी त्यांनी गोव्यातील महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, पंजाबातील अकाली दल, आसाम गण परिषद इत्यादी पक्षांची आजची अवस्था काय याचे अवलोकन करावे.

# धर्मगुरू डॉ. बाबूसिंग महाराज (आमदार, विधान परिषद)यांच्या हस्ते

## श्री अर्जुन चव्हाण यांना राष्ट्रीय गोर बंजारारत्न पुरस्कार २०२५ देऊन गौरव

बीड / प्रतिनिधी

दिनांक ११-०१-२०२५ रोजी धर्मतपस्वी डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय बंजारा फेडरेशन भारत या राष्ट्रीय संस्थेच्या वतीने बंजारा समाजातील सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक,कला क्रीडा वेगवेगळ्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करणा-या व्यक्तीला राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च पुरस्कार राष्ट्रसंत डॉ.रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार देऊन सन्मान केला जातो... श्री अर्जुन चव्हाण कृषी पर्यवेक्षक शासकीय अन रोपवाटिका राजुरी नवगण तालुका जिल्हा बीड.. यांची कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना नुकताच पद्मश्री कृषी सेवा रत्न पुरस्कार राज्याचे महामंडळ राज्यपाल श्री सीपी राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले होते.. या कार्याची दखल घेऊन त्यांची राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार २०२५ या पुरस्कारासाठी निवड झाली... दिनांक ११ १ २०२५ रोजी वार शनिवार जगातील बंजारा समाजाची काशी गोरधर्म पीठ उम रीगड रोड पोहरादेवी या ठिकाणी बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज पोहरागड पिठाचे जागतिक धर्मगुरू डॉ. बाबूसिंग महाराज( विधान परिषद सदस्य महाराष्ट्र राज्य ), गोरबंजारा धर्मपिठाचे महंत जितेंद्र महाराज, महंत सुनील महाराज, महंत कबीरदास महाराज व देशातील सर्व महंत यांच्या उपस्थितीत



श्री अर्जुन चव्हाण,कृषी पर्यवेक्षक यांचा सहपत्नीक शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.... यावेळी राष्ट्रीय संस्थेचे प्रमुख श्री विजय नायक राठोड त्यांनी कार्यक्रम ाच्या प्रस्ताविकास २९ राज्य मध्ये गोर बंजारा बांधवांच्या प्रगती बाबत माहिती दिली. २०२५ मध्ये २९ राज्यातील २० व्यक्तींना राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे असे सांगितले.. बंजारा समाजाचे धर्मगुरू डॉक्टर बाबुसिंग महाराज यांनी या संस्थेच्या कार्याची प्रशंशा करून देशातील सर्व बंजारा बांधवांना एका ठिकाणी जोडण्याचे काम ही संस्था करत आहे असे सांगून वेगवेगळ्या राज्यातून आलेल्या बंजारा समाजातील सर्व वेगवेगळ्या क्षेत्रातील बांधवांना संत सेवालाल म हाराज यांच्या कार्याची माहिती दिली. राष्ट्रसंत डॉक्टर रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा पुरस्कार मिळालेल्या सर्व सत्कारमूर्तीचे अभिनंदन केले. तसेच श्री अर्जुन चव्हाण यांनी महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या सेवेत राहून उत्कृष्ट कार्य केले आहे.. कृषी व समाजाचे कार्य त्यांच्या हातून कायम होत राहील यासाठी आशीर्वाद दिले... गोरधर्म पिठाचे महंत जितेंद्र महाराज यांनी भारतातील सर्व गोर बंजारा बांधव एकत्र येऊन वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांचा सन्मान होतो.. ही बाब समस्त गोर बंजारा साठी कौतुकास्पद आहे.. याचा आमच्या महंत व सर्व धर्मगुरूंना अभिमान वाटतो असे सांगितले... वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणा-या सर्वच समाजसेवक बांधवांनी समाजाच्या प्रगतीसाठी झटावे असे सांगितले.... श्री अर्जुन चव्हाण यांच्या कृषी क्षेत्रातील कार्याबद्दल या मिळालेल्या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातून वसंतराव नाईक अधिकारी कर्मचारी संघटनेचे श्री बाबासाहेब चव्हाण,प्राध्यापक डॉक्टर जगन्नाथ चव्हाण मुख्याध्यापक श्री शिवाजी जाधव,कृषी पर्यवेक्षक लहू चव्हाण,माध्यमिक शिक्षक गोरख जाधव कृषी पर्यवेक्षक राजेंद्र सांगळे, इंजिनीयर अतुल चव्हाण, बंजारा समाजाचे नेते श्री अंकुश राठोड,प्राचार्य राजेश कुमार राठोड,विमा सल्लागार श्री राजेश जाधव,परमेश्वर जाधव, सेल टॅक्स ऑफिसर राजेंद्र राठोड,वरिष्ठ प्रशासन अधिकारी संजय चव्हाण, लिपिक अविनाश राठोड,युवा नेते कैलास जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर पृथ्वीराज जाधव, संदीप राठोड, सेवानिवृत्त कृषी अधिकारी विष्णू जाधव,चव्हाण व जाधव परिवारातील ज्येष्ठ मार्गदर्शक,गुरुवर्य व कुटुंबातील सर्व सदस्य कार्यक्रम स्थळी उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ जागतिक कीर्तीचे व्हावे-प्रा.सुशीलाताई मोराळे

बीड-प्रतिनिधी तब्बल १७ वर्षाच्या प्रदिर्घ संघर्षानंतर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा लढा १४ जानेवारी १९९४ ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाव देऊन थांबला. हे विद्यापीठ जागतिक कीर्तीचे व्हावे येथे जगातून विद्यार्थी यावेत, नालंदा, तक्षशिला विद्यापीठाप्रमाणे या विद्यापीठात अध्ययन व्हावे असे प्रतिपादन नामांतर योध्दा पुरस्काराला उत्तर देताना पुरस्कार्थी प्रा. सुशीला ताई मोराळे यांनी केले आहे. कार्यक्रमाचे आयोजन महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष रतनकुमार पंडागळे आणि स.सो. खंडाळकर यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे चंद्रकांत हंडोरे आणि अध्यक्ष म्हणून प्रा. निकम सर होते. सतरा वर्ष चाललेल्या महामानवाचे नाव देण्याच्या लढ्याचे नेतृत्व तत्कालीन विविध संघटना काम करणाऱ्या मराठवाड्यासह महाराष्ट्रातील अनेक नामवंतांनी केले. निजामाची राजवट संपवण्यासाठी ज्या हिरीरीने लोक लढले त्याच पद्धतीने ज्यांच्या पिढ्यानपिढ्या दारिद्र्यात खितपत पडल्या होत्या अशा रतन पंडागळे, राजाराम राठोड, गजमल माळी, मोतीराज राठोड, प्रा. सुरेश पुरी, बापूराव जगताप, म. य. उर्फ बाबा दळवी, अजित दळवी रशीद मामू, डॉक्टर देसारडा, एडवोकेट शरद गव्हाणे, गंगाधर गाडे, रामदास आठवले, नामदेव ढसाळ, राजा ढाले, प्रा. अरुण कांबळे, ज. वि. पवार, प्रा. जोगेंद्र कवाडे, अंकुश भालेकर, सुभाष लोमटे, विष्णू ढोबळे, जनार्दन तुपे, उषा ठोंबरे-दराडे, डॉक्टर लोहिया द्वारकादास, बन्सी जोगदंड, कॉम्रेड अतहर बाबर, कॉम्रेड गंगाधर आप्पा बुरांडे, क्रांती चौधरी दिनकर बोराडे बबन वडमारे, सुमनताई वडमारे, आवडाबाई डोंगरे ताई कौशल्या अवसरमल मुरली भाऊ वडमारे बाबू पोटभरे पप्पू कागदे हिरामण वडमारे मी स्वतः सुशीला मोराळे प्रताप बांगर रामराव जाधव सुरेश वरपूडकर अशी शेकडो नावे सांगता येतील. केवळ विद्यापीठाची पाटी बदलण्यापुरता मर्यादित हा लढा नव्हता बाबासाहेबांची अस्मिताही होती. या आंदोलनात मोर्चे, धरणे, जेलभरो, प्राणांतिक उपोषण या सर्व हत्याराचा वापर केला गेला तरीही सरकार नामांतर विरोधात होते. मोर्चेकर्यावर अश्रुधुराच्या नळ कांड्या फोडल्या पाण्याचे फवारे मारले लाठीचार्ज केला. जेलमध्ये टाकली तरीही आंबेडकरी जनता आणि समर्थक तसुभर ही हटले नाहीत. बाळासाहेबांच्या सेनेने सुरुवातीला विरोध केला स्वतः बाळासाहेब म्हणाले मफ ज्याच्या घरात नाही पीठ त्यांना कशाला पाहिजे विद्यापीठ त्यावर नामांतरवादी म्हणाले नसेलफ आमच्या घरात पीठ आम्हाला पाहिजे विद्यापीठ. लढेंगे जितेंगे. जोगेंद्र कवाडे सरांनी नागपूर दीक्षाभूमी ते विद्यापीठ लॉन्ग मार्च काढला हजारो लोक या सामील झाले. सरकारने बळाचा वापर केला तरीही लोक चालतच होते शेवटी लाँग मार्च आढवण्यात आला लोकांना जेलमध्ये टाकले दहा दिवस बारा दिवस हजार लोकांनी जेलमध्ये जाणे स्वीकारले जामीन नाकारले. लॉन्ग मार्चमध्ये आमच्या घोषणा खुन भी देंगे जान भी देंगे नामांतर लेके रहेंगे. नामांतर करो जनतंत्र की लाज रखो, तोड के दिया पाकिस्तान छिन के लेंगे दलित स्थान. त्यामुळे सरकारला शेवटी नमावे लागलं. एकदाचा नामविस्तार झाला नांदेडला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची मंजुरी दिली गेली. खरंतर बाबासाहेबांची दूरदृष्टी घेऊन मिलिंद महाविद्यालय सुरू केल्यामुळेच १९५८ ला मराठवाडा विद्यापीठ मंजूर होऊ शकले. कॉलेज असल्याशिवाय विद्यापीठ निर्माण होऊ शकत नाही हा नियम आहे. उच्चवर्णीय समाजाने नामांतराला कडाडून विरोध केला त्यांच्या विरोधात न जुमानता नामविस्तार झाला. ३१ वर्ष झाली मात्र विद्यापीठात ज्या ताकतीने अभ्यासक्रमामुळे होणे गरजेचे होते ती ताकद कमी पडत आहे. डॉक्टर रे.प. नाथ, डॉक्टर शंकरराव खरात, का. पा. सोनवणे, डॉक्टर नागनाथ कोत्तापल्ले असे दिग्गज कुलगुरू विद्यापीठाला मिळाले डॉक्टर शेषराव चव्हाण, डॉक्टर ब.मा. पाटोदेकर, डॉक्टर भगतसिंग राजूरकर सर डॉक्टर नागरगोजे असे कुलसचिव मिळाले मात्र आज एखांदा आपा सोडला तर आज विद्यापीठात हवे तसे दर्जेदार संशोधन होत नाही, जागतिक कीर्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे नाव दिले



माजलगाव-माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रकाश दादा सोळंके यांचे एक छोटेसे ऑपरेशन झाल्याने ते इस्पितळात दाखल झाले होते तेंव्हा सह्याद्री अतिथीगृह येथे मा.उपमुख्यमंत्री अजित दादांनी सदिच्छा भेट घेत तब्येतीची विचारपूस केली.

## समता परिषदेची गाव तेथे शाखा, घर तेथे समता सैनिक अभियान राबवणार-ॲड.सुभाष राऊत

जालना-प्रतिनिधी येणाऱ्या काळात समता परिषदेची गाव तेथे शाखा घर तेथे समता सैनिक अभियान समता परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष आ. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार असून समता सैनिकांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीच्या तयारीला लागावे असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे. जालना शहरातील संत सावता महाराज भवन येथे जालना जिल्ह्यातील पदाधिकारी व समता सैनिकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी मार्गदर्शन करताना ॲड. सुभाष राऊत बोलत होते. या बैठकीला समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत, जालना जिल्हाध्यक्ष प्रा.मधुकर झरेकर, युवक अध्यक्ष विशाल धानोरे, शहराध्यक्ष दिपक वैद्य, तोडतले मामा, रवि उकर्डे यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना ड. सुभाष राऊत पुढे म्हणाले की, छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज समता परिषद मराठवाडा नव्हे तर महाराष्ट्र आणि भारतात पोहोचली आहे. सर्वत्र समता परिषदेचे पदाधिकारी मोठ्या जोमाने कार्य करीत आहेत. जालना जिल्ह्यात देखील ओबीसी समाज मोठ्या संख्येने आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यात आता समता परिषदेची गाव तेथे शाखा, घर तेथे समता सैनिक अभियान राबविले जाणार असून समता परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, शासकीय कर्मचाऱ्यांची बिंदू नियमावलीनुसार पदोन्नती, महिलांचे प्रश्न आदी प्रश्न सोडविण्यासाठी समता परिषदेने प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. जालना जिल्ह्यामध्ये समता परिषदेच्या माध्यमातून ओबीसी समाजाची ताकद निर्माण करून येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकांसाठी तयारीला लागावे असे आवाहन देखील ॲड. सुभाष राऊत यांनी याप्रसंगी केले. बैठकीस जालना जिल्ह्यातील समता परिषदेचे पदाधिकारी व समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## केज नगरपंचायत कार्यालयाने दिलेले वाईन शॉप नाहरकत रद्द करण्यात यावे-बिअरबार असोसिएशनची मागणी



केज/प्रतिनिधी केज नगरपंचायत कार्यालयाने दिलेले वाईन शॉप नाहरकत रद्द करण्यात यावे अशी लेखी निवेदनाद्वारे बिअरबार असोसिएशनच्या वतीने केज नगरपंचायत कडे मागणी केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी नगरपंचायत कार्यालयाने वाईन शॉपला नाहरकत दिलेले आहे सदर वाईन शॉपला दिलेले नाहरकत रद्द करण्यात यावे कारण की, केज तालुक्यात मोठ्या प्रमाणावर बिअरबार, बिअर शॉपी व देशी दुकानाची संख्या मोठ्या प्रमाणात झालेली असून त्यांचे अगोदरच अतोनात नुकसान होत असून व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे. त्यामध्ये आपण दिलेले नाहरकत हे आमच्या असोसिएशनला विचारात न घेता देण्यात आले असून भविष्यात वाईन शॉपला नाहरकत देता वेळी आमच्या असोसिएनला विचारात घेऊन वाईन शॉपला नाहरकत देण्यात यावे असे लेखी निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर असोसिएशनचे अध्यक्ष श्रीहरी जाधव, उपाध्यक्ष शंकर तपसे, कोषाध्यक्ष अमोल पोपळे, सचिव विलास सोनवणे यांच्या स्वाक्ष-या आहेत. सदर मागणीचे निवेदन हे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांना देण्यात आले आहे.

वाईन शॉपला नाहरकत देण्याची प्रक्रिया पूर्ण केलेले नाही. सदर नाहरकत देतेवेळी केज नगरपंचायतच्या लोकप्रतिनिधी यांना विचारात न घेता व त्यांना सदर प्रकरणी कसल्याच प्रकारची माहिती न देताच परस्पर सदर वाईन शॉपला नाहरकत देण्यात आले आहे. सदर प्रकरणच्या विरोधात वेगवेगळे निवेदनाद्वारे हरकती कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. सदर वाईन शॉपला नाहरकत देण्याची प्रक्रिया (प्रोसेस कम्प्लीट) न केल्यामुळे व सदर हरकतीच्या आधारे मीटिंगमध्ये जनरल बॉडी समोर ठराव मांडून एक मताने मंजूर करण्यात आला आहे. नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व हारुणभाई इनामदार यांनी आमच्या प्रतिनिधीशी चर्चा करताना माहिती दिली.

# स्वच्छतेची शिकवण वाणातुन देऊ;एकात्मतेचा संदेश घेऊन जाऊ केज तालुक्यातील देवगाव येथील ग्रामपंचायतीच्या वतीने दिला संदेश

--केज/प्रतिनिधी:- वर्षातील पहिल्या सणांची सुरुवात ही सुवासिनी स्त्रियाचा सण म्हणजे मकरसंक्रांत महिलांचा उत्साहाचा आणि आनंददायी सण यानिमित्त महिला एकमेकींना वाण म्हणून अनेक गृह उपयोगी वस्तूंची भेट देतात यंदा महागाईने कळस गाठला असला तरी वाण खरेदीला महिलांनी गर्दी केली होती एकमेकींना हाळदी कुंकवाच्या नैसर्गिक बोरिबेट हा ऊस या संयुक्त पारंपारिक चा वाण भेट देऊन उत्तम आरोग्य आणि एकात्मतेचा संदेश महिलांनी देत यावेळी मकरसंक्रात साजरी केलीमकरसंक्रांत म्हणजे प्रत्येकमहिलेच्या आपुलकीचा प्रेमाचा हा आनंददायी सण असतो प्रत्येक महिला




प्रत्येकाच्या घरी जाऊन वाण देवाणवाण करत असतात परंतु देवगाव ग्रामपंचायत सरपंच सौ रुपालीताई मुंडे यांनी सर्व महिलांच्या संयुक्तपणे शेकडो महिला एकत्रित येऊन गावातील तुकाई मंदिर येथे मकरसंक्रांतीचा कार्यक्रम ठेवण्यात आला यामध्ये सरपंच सौ रुपालीताई मुंडे यांच्या पुढाकारातून सहभाग नोंदवून गावातील सर्व घरातील महिलांनी वान लुटण्याचे आव्हान केले व यामध्ये सर्व जाती धर्माच्या महिलांनी सहभागी होऊन गावातील एकात्मतेचा संदेश दिला यामध्ये महिलांना वाण देऊन यावेळेस गावातील सार्वजनिक उपक्रमामध्ये सहभागी होण्याचा निश्चय केला यावेळेस उखाणे स्पर्धा घेण्यात आला,सौ ,रुपालीताई मुंडे यांच्या वतीने गावातील सर्व जाती धर्माच्या महिलांना एकाच ठिकाणी एका छताखाली आणून शेकडो महिलांना एकत्रित करण्याचा व पारंपारिक पद्धतीने बोर जांब गाजर ऊस फुल बिबे ढाळ एकत्रित केलेला ओलावान एकमेकांनी निसर्ग पूरक वस्तू वापरल्या हळदी कुंकवाच्या वाणाचा कार्यक्रम घेऊन तसेच म हिलांनी पारंपारिक खेळ उखाणे स्पर्धा घेण्यात आल्या होत्या यावेळी हा मकर संक्रांतीचा कार्यक्रम प्रेमाने एकमेकांना सालोख्याने सण उत्साहात पार पडला

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक महेश आनंद गावकर यांचा सत्कार

केज/ प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड. येथे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा धारूरचे शाखा व्यवस्थापक म हेश माणीकराव आनंदगांवकर यांनी दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी सदिच्छा भेट दिली.यावेळी स्वानंद सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने त्यांचा शाल, पुष्पहार देवून ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव( बप्पा) गायकवाड यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी ग्रामीण भागात दर्जेदार व लोकाभिमुख गंथालय पाहून खुपच समाधान वाटल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी रविंद गायकवाड ( पेंटर ) यांनी प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन व्यक केले.



## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात ग्रंथ परिक्षण व कथन स्पर्धा संपन्न प्रा. आनंदगांवकर यांनी केले ग्रंथपरिक्ष यावर मार्गदर्शन.

केज/ प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड. येथे २९ डिसेंबर. २०२४ ते १ ६ जानेवारी २०२५ या कालावधीत ङ्ग वाचन संकल्प महाराष्ट्राचाङ्ग अंतर्गत दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी ङ्ग ग्रंथ परिक्षण व कथन स्पर्धाङ्ग व ग्रंथ प्रदर्शन घेण्यात आले. ङ्ग ग्रंथ परिक्षण म म या विषयावर जेष्ठ साहित्यीक, लेखक, कवी प्रा. माणीकराव आनंदगांवकर यांनी सखोल मागदशन केले. ग्रंथ परि क्षणातील खुबी अचूकपणे मांडली. ग्रंथ चांगला कि वाईट कसा ठरवायचा यावर विवेचन केले. ग्रंथ हेच मानवाचे खरे सोबती आणि मित्र असल्याचेही प्रतिपादन त्यांनी केले. त्यानंतर कथन स्पर्धा घेण्यात आली. कथन स्पर्धेत लक्ष्मी पुंड,श्रुती पुंड, रोहण गायकवाड, ज्ञानेश्वरी पुंड, रविकिरण गायकवाड यांनी सर्वोत्तम असे कथन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजीनाना गायकवाड हे होते, प्रमुख पाहुणे म्हणून शिवदासअप्पा गायकवाड, नारायण भाऊ गायकवाड, रावसाहेबभाऊ गायकवाड, रामकिसन भाऊ गायकवाड यांनीही उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले. ग्रामसेवक हेड गिरे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी कमलाकर साबळे, देविदास गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, बबन पुंड, संजय सोनवणे, रविंद्र गायकवाड,माजी सरपंच रामराजे गायकवाड, रामाहेब जाधव, बापुराव गायकवाड, बालासाहेब गायकवाड, आर. एस. पाटील, सुखदेव गायकवाड, ईश्वरी गायकवाड, सिताराम वैरागे, बालाजी काळे, चंद्रकांत गायकवाड, दादासाहेब गायकवाड, शिवराज भोगजकर यांच्यासह वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर ग्रंथप्रदर्शनातही सवांनी सहभाग घेतला. यावेळी छत्रपती स्वराज्य रक्षक संभाजी महाराज राज्याभिषेक दिन संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे शाल, व पुष्पहार देवून ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव( बप्पा) गायकवाड यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी केले तर आनंद( भैय्या) गायकवाड यांनी आभार मानले

## आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, व स्वानंद सार्वजनिक

**वालनालयाच्या संयुक्त विद्यमाने युवा सप्ताहास प्रारंभ.**



केज/प्रतिनिधी आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता. केज. जि. बीड व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंद गांव ता. केज. जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने १२ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत युवा सप्ताह साजरा होत आहे.या निमित्त खास महिलांसाठी विविध सांस्कृतिक, क्रिडास्पर्धा, सामाजिक उपकृम आयोजित केलेले आहेत.१२ जानेवारी २०२५ रोजी ङ्ग राष्ट्रमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महिला व युवती यांच्या हस्ते जिजामाता व विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.यावेळी महिला व युवतींनी विविध गीत व उत्स्फुर्त भाषण करून जिजामाता व विवेकानं यांच्या जिवन कार्यावर थोडक्यात विचार व्यक्त केले.दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी लंगडी स्पर्धा, अभिव्यक्ती स्पर्धेत सहभता घेवून विविध माध्यमातून उदा. भजन, गळण, अभंग. गीत गायन, भारूड, काव्य वाचन अशा प्रकारे महिला व्यक्त झाल्या.दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथप्रदर्शनात सहभाग नोंदवला.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद जयंती साजरी.

केज/प्रतिनिधी

राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सरवदे व मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी प्रतिमा पुजन करुन पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष इ.७ वीची विद्यार्थिनी प्रियंका अशोक देटे व प्रमुख पाहुणे म्हणून इ.६ वीची विद्यार्थिनी श्वेता सुहास सरवदे, नेहा सतिश माने या होत्या.राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथील भुईकोट राजवाड्यात झाला.वडील लखुजी जाधव व आई म्हाळसादेवी ऊर्फ गिरजाबाई हे होत. त्या छत्रपती शिवाजी राजे भोसले यांच्या आई व शहाजी राजे भोसले यांच्या पत्नी होत्या.हिंदवी स्वराज्य निर्मिती करण्यात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना उपदेश दिला व वेळोवेळी मार्गदर्शन केले.स्वामी विवेकानंदांचा जन्म कोलकाता येथे १२ जानेवारी १२३६ रोजी झाला.वडील विश्वनाथ दत्त होते व आई भुवनेश्वरी दत्त होत्या.ते रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य होते.त्यांचे मुळ नाव नरेंद्र होते.त्यानी हिंदु धमबाबत विशेष माहिती अमेरिकेत पटवून हिंदु धर्माचे श्रेष्ठत्व पटवून दिले.युवकांना विशेष मार्गदर्शन केले.अशी माहिती या शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी दिली.विद्यार्थ्यांनी, विद्यार्थ्यिनिंनी,शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे, उपाध्यक्ष सीमा सुधीर मोहिते,सदस्य, तरनळी ग्रामपंचायत सरपंच म हादेव खेडकर , उपसरपंच शिवाजी मोहिते,राधा आक्का खामकर, शिक्षक भारत बाबुराव हांगे, बाळासाहेब भिल्लु राठोड, बाबासाहेब राजाराम मैंद,शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम, श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम,शापोआ कामगार गणेश काशिनाथ माने हे उपस्थित होते.राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या वेषात विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वीची श्रध्दा संपत्ती सरवदे यांनी केले व इ.६ वहीची श्वेता सुहास सरवदे यांनी कार्यक्रमास उपस्थितांचे आभार मानले.या शाळेतील शिक्षिकांना श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन व विद्यार्थ्यांना, सर्व उपस्थितांना गोड पदार्थ खाऊ म्हणून वाटप केला व कार्यक्रम संपन्न झाला.




# सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या संयुक्त जयंती निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या ३४ मान्यवरांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने पुरस्कार देऊन केले सन्मानित

**केज शहराच्या विकासासाठी अहोरात्र तत्पर-हारूणभाई इनामदार शहरातील शंभर बचत गटाला व्यवसायासाठी निधी उपलब्ध करणार-सीताताई बनसोड**

केज/प्रतिनिधी सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या संयुक्त जयंती निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या ३४ मान्यवरांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने पुरस्कार देऊन केले सन्मानित करण्यात आले.केज शहराच्या विकासासाठी अहोरात्र तत्पर असल्याचे प्रतिपादन हारूणभाई इनामदार यांनी केले आहे. यापुढे शहरातील शंभर बचत गटाला व्यवसायासाठी निधी केज नगरपंचायत च्या माध्यमातून उपलब्ध करणार करणार आहोत असे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी बोलताना सांगितले आहे. सावित्रीबाई फुले व राजमाता राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधत. जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या संकल्पनेतून समाजातील सामाजिक,राजकीय,सांस्कृतिक, अध्यात्मिक,शैक्षणिक,क्रीडा, वैद्यकीय,प्रशासकीय,पत्रकारिता, उद्योजक, संशोधन, गायन इत्यादी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणा-या ३४ मान्यवरांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड तर प्रमुख पाहुणे म्हणून जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेवक खैसरभाई इनामदार, नगरसेविका सौ. पद्मिनी अक्का शिंदे,नगरसेविका सौ.पल्लवीताई रांजणकर, नगरसेवक बाळासाहेब गाढवे, नगरसेवक मुस्तफा शेट खुरशी, नगरसेवक युनूसभाई शेख, युवा नेते लखन हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूपदीपाने पूजा करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे जनविकास परिवर्तन आघाडीच्या व केज नगरपंचायतच्या वतीने शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी शहरातील १० बचत गटाला केज नगरपंचायत च्या पुढाकारातून



आयसीसी बँके कडून ८० लाख रुपयांचे कर्ज वाटपाचे पत्र देऊन बचत गटांच्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना हारुणभाई इनामदार यांनी सांगितले की, केज शहरातील अनेक मुख्य रस्त्याचे व गल्लीतील रस्त्याचे कामे करण्यात आली आहेत. त्याचबरोबर बाराशे घरकुल मंजूर करून आणले आहेत दोनशेहून अधिक घरकुलाचे कामे चालू आहेत लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे वर्ग करण्यात आले आहेत तर उर्वरित घरकुलांची कामे देखील लवकरच चालू करण्यात येणार आहेत. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, केजच्या भूमीमध्ये जन्म घेऊन विविध क्षेत्रांमध्ये अनेक मान्यवरांनी कौतुकास्पद कार्य करून केजची मान उंचावली आहे त्यांचा सन्मान करणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे म्हणून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा-या मान्यवरांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे व त्यांचा गुणगौरव करण्याचा आम्हाला योग आला व आमच भाग्य मोठे आहे की, आम्हाला सर्वांची सेवा करण्याचा एक योग आला आहे. केज शहराच्या विकासासाठी आमची जनविकास परिवर्तन आघाडी आम्ही अहोरात्र तत्पर आहोत शहराच्या विकास कामासाठी आम्ही कुठेच कमी पडणार नाहीत असे बोलताना त्यांनी स्पष्ट केले आहे. अध्यक्षीय समारोपप्रसंगी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड म्हणाल्या की, महिलांनी स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून विविध व्यवसाय करून स्वतः स्वतःच्या पायावर उभा टाकावे नगरपंचायतच्या माध्यमातून महिलांना बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय करण्यासाठी लागणारी सर्व मदत आम्ही करण्यास कटिबद्ध आहोत. महिलांना व्यवसाय करण्यासाठी विविध बँकेचे कर्ज उपलब्ध करण्यासाठी नगरपंचायत सक्षम आहे परंतु महिलांनी कर्जाची परतफेड वेळेत करावी जे बचत गट वेळेत कर्ज फेडतील त्यांना लागेल तेवढे कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. यापुढे शंभर बचत गटाना नगरपंचायतच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देणार आहोत. पुढे बोलताना बनसोड म्हणाल्या की, मागील तीन वर्षापासून नगरपंचायतची सत्ता आमच्या हाती आल्यापासून आम्ही केज शहराचा विकास मोठ्या प्रमाणात केला आहे. यापुढेही राहिलेली सर्व कामे पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने प्रा.डॉ.हनुमंत सौदागर प्रा.डॉ.शंकर वाघमारे, प्रा.डॉ.बी.जे. हिरवे, डॉ.ह.भ.प. छत्रभुज वायबसे, पत्रकार रामदास तपसे, तात्या गवळी, दशरथ चवरे, श्रीमती जनाबाई खाडे, प्रा.डॉ. नवनाथ काशीद, अनिल वैरागे, दत्तात्रय मजमुले, सामाजिक कार्यकर्त्या तसलीम शेख, श्रीमती पूजा शिरसाट, श्रीमती संगीता खंडाळे यांच्यासह ३४ मान्यवरांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी केज नगरपंचायतचे नगरसेवक, कर्मचारी, पत्रकार बांधव, जनविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि बचत गटाच्या महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १७ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## पहिल्या टप्प्यात १० हजार रोजगार निर्मितीचा कार्यक्रम-आ.पाटील

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) पहिल्या टप्प्यामध्ये दहा हजार रोजगार निर्मितीचा आपला प्रयत्न आहे अशी माहिती आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांनी दिली. तुळजापूर तालुक्यातील किलज येथे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय संपादन केल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास सुनील चव्हाण, नितीन काळे, सतीश दंडनाईक, युवा नेते विनोद गंगणे, सचिन पाटील, ॲड. दीपक आलुरे, वसंत वडगावे, प्रभाकर मुळे, प्रशांत लोमटे, अनिल बंडगर, प्रभाकर भोसले, दिनकर पाटील, अशोक शेळके, वैजीनाथ कोणाळे, बनसिद्धप्पा कोणाळे, शिवराज मरडे, विठ्ठल मरडे, विलास मरडे उपस्थित होते. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले की, राज्यात महायुती व देशात मोदींचे केंद्र सरकार देशहित आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करीत आहे. सरकारकडून गवंडी समाजासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून मुलांचे शिक्षण, पक्के घर बांधणी, मध्यान्ह भोजन योजना यांच्यासह राबविण्यात येणाऱ्या इतर कल्याणकारी योजनांची माहिती दिली. धाराशिव जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी आपले नियोनबद्ध प्रयत्न सुरू आहेत. पर्यटन, उद्योग व शाश्वत सिंचनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करण्यासाठी आपण एक कालबद्ध कृती कार्यक्रम आखला आहे. पहिल्या टप्प्यात १० हजार रोजगारनिर्मिती करण्याचा आपला निश्चय असून यासाठी आपली साथ गरजेची आहे. सामाजिक सभागृहासाठी १० लाख किलज येथे गवंडी समाजबांधवांच्या विविध कार्यक्रम व उपक्रमांसाठी राजा भगीरथ सामाजिक सभागृहाची मागणी गवंडी समाजबांधवांनी केली. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी तातडीने त्यासाठी आमदार निधीतून १० लाख निधी देण्याचे आश्वासन दिले.

# सरकारी कर्मचाऱ्यांना सरकार पावले




नवी दिल्ली। वृत्तसंस्था पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी देण्यात आली आहे. दरम्यान या आठव्या वेतन आयोगामुळे १.२ कोटींहून अधिक केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांच्या वेतन आणि निवृत्तीवेतनामध्ये सुधारणा होणार आहे. याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी पुढील वर्षी सादर केल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सातव्या वेतन आयोगाची मुदत ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपत असल्याने केंद्रीय सरकारी कर्मचारी या संदर्भातील घोषणा होण्याची आतुरतेने वाट पाहत होते. नव्या वेतन आयोगाच्या स्थापनेबाबत गेल्या एका वर्षभरात कर्मचारी प्रतिनिधी आणि विविध कामगार संघटनांनी सरकारसोबत अनेक बैठका घेतल्या आहेत. अर्थसंकल्पपूर्व बैठकीचा भाग म्हणून संघटनांनी अलीकडेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेत, सुमारे ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ६७ लाख निवत्तीवेतनधारकांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याची मागणी केली होती. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही घोषणा करताना, २०२६ पर्यंत आठव्या वेतन आयोगाची स्थापना होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी आधीच लागू करण्यात आल्या आहेत. सरकार नंतर आयोगाच्या सदस्यांसह इतर तपशीलांची माहिती देईल. सातव्या वेतन आयोगाद्वारे केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन रचनेत, भत्त्यात आणि निवृत्तीवेतनात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. ज्यामुळे वेतन समानता आणि कर्मचारी व निवृत्त निवृत्तीवेतनधारक दोघांनाही त्याचा फायदा झाला. यानंतर, आता सर्व केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचे लक्ष ८ व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या संभाव्य अंमलबजावणीकडे लागले आहे. १९४६ साली केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी पहिला वेतन आयोग स्थापन करण्यात आला होता. तेव्हापासून, केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना विविध केंद्रीय वेतन आयोगांद्वारे त्यांच्या वेतन आणि निवृत्तीवेतनात वेळोवेळी सुधारणा करण्यात येत आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा महागाई आणि आर्थिक बदलांशी ताळमेळ घालण्यासाठी वेतन आयोग स्थापन करण्यात आला होता. दरम्यान २८ फेब्रुवारी २०१४ रोजी सातवा वेतन आयोग स्थापन करण्यात आला होता. त्याच्या शिफारशी १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात आल्या आहेत.

## माऊली बालकाश्रम बीडचे जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवांमध्ये घवघवीत यश



बीड-प्रतिनिधी माऊली विद्यापीठ संचलित, माऊली बालकाश्रम एमआयडीसी एरिया बीड चे महिला व बालविकास विभागातर्फे आयोजित जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवांमध्ये नृत्य स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे यश मिळवले यामध्ये चि. वाघमोडे ओमराज, उदागे समर्थ, तिडके कृष्णा , गालफाडे प्रवीण, श्याम पाटोळे,राठोड जालिंदर तर कॅरम स्पर्धेत समर्थ उदागे, विजय राठोड, कृष्णा तिडके यांनी प्रथम क्रमांक मिळवला, चित्रकला स्पर्धेत अजय राठोड याने द्वितीय क्रमांक मिळवला, गोळा फेक स्पर्धेत वाघमोडे ओमराज याने तिसरा क्रमांक मिळवला तर संगीत खुर्ची मध्ये सदानंद सोनुनकर यांनीही तिसरा क्रमांक मिळवला , तर रिले स्पर्धेत वाघमोडे ओमराज,सुनील राठोड, जीवन जाधव, वंजारे विष्णू या सर्व बालकाश्रमातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले व यशाची परंपरा राखली या सर्वांना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी फारुक शेख, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे, माऊली विद्यापीठाचे कोषाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष नवनाथराव थोटे, जिल्हा परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव सह इतर सन्माननीय प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रमाणपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. या मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल माऊली विद्यापीठाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री अशोकराव पाटील , माऊली विद्यापीठाच्या प्रमुख तथा खासदार सौ. रजनीताई पाटील, माऊली विद्यापीठाचे सचिव आदित्य दादा पाटील

## आ.संदीप क्षीरसागरांची नवीन संकल्पना
### प्रशासन मतदारसंघातील गावोगावी जाणार

बीड दि.१६ (प्रतिनिधी): ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांना शासनस्तरावरील योजनांची माहिती देण्यासाठी गावोगावी जाऊन प्रशासनाने शिबीर घ्यावेत आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध योजनांची माहिती द्यावी अशी नवीन संकल्पना आ.संदीप क्षीरसागर यांनी सुचवून याबाबतचा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आता जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात बीड तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन प्रशासनाकडून शिबीर घेण्यात येणार आहेत. शासनाच्या योजना विविध योजना शेतकरी, दुर्बल घटक आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी अधिक प्रभावी मार्गाचा अवलंब केला जावा. या हेतूने आ.संदीप क्षीरसागर यांनी नवीन संकल्पना सूचविली. महसूल विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग यांसह इतर विभागांच्या अधिकारी व कर्मचारी यांनी गावोगावी जाऊन संयुक्तरित्या शिबीर घ्यावेत. या शिबीरांमध्ये प्रत्येक घटकातील लोकांसाठी असलेल्या योजनांची त्या-त्या लोकांना देऊन त्यांना असलेल्या शंका आणि समस्यांचे निराकरण करावे. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना दिले होते. यावर आता तहसिलदार यांनी आदेश काढले आहेत. दि.२२ जानेवारी ते ३१ जानेवारी या काळात बीड तालुक्यातील प्रत्येक गावात असे शिबीर घेण्यात येणार आहेत. दरम्यान आ.संदीप क्षीरसागरांच्या या नाविन्यपूर्ण संकल्पनेचा फायदा ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे.

## गुडन्यूज ! शिक्षक भरतीच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात

मुंबई दि.१६(प्रतिनिधी): राज्यातील बीएड धारक व शिक्षक होऊ इच्छिणाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि आनंदाची बातमी असून शिक्षक भरतीच्या दुसऱ्या टप्प्याला लवकरच सुरुवात होणार आहे. त्यासाठी, २० जानेवारीपासून पवित्र पोर्टल सुरु होणार आहे. त्यामुळे, शिक्षक भरतीची वाट पाहणाऱ्या उमेदवारांना आणखी संधी आली आहे. झेडपी शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांची संख्या पुरेशी आवश्यक असून आगामी काळात सेमी इंग्रजीचे वर्ग देखील या शाळांमध्ये सुरू करण्याचे नियोजन आहे. दरम्यान, अनेक जिल्हा परिषदांमधील शिक्षकांच्या रोस्टरबद्दल तक्रारी होत्या. त्यातील अडचणीही दूर झाल्याने आता लवकरच राज्यात शिक्षकांची मोठी भरती होईल. शिक्षण विभागाने शासनाकडे १४ ते १५ हजार शिक्षकांची भरती करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार, आता शिक्षण विभागाने संबंधित संस्थांकडून जाहिरात मागवली आहे. त्यामुळे, इच्छुकांना ही नामी संधी आहे. शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमता बाचणी-२०२२ नुसार पवित्र पोर्टलद्वारे पहिल्या टप्यातील पदभरतीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. आता, दुसऱ्या टप्प्यातील पदभरतीकरिता शासन निर्णय दि.१० नोव्हेंबर २०२२ नुसार कार्यवाही करावयाची आहे. त्यासाठी येथील शासन निर्णय १४ जानेवारी २०२५ नुसार पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक पदभरतीसाठी ऑनलाईन कामाकरीता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी व्यवस्थापनांना पोर्टलवर जाहिरात नोंद करण्याची सुविधा २० जानेवारी २०२५ रोजी सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे, संस्थांनी पवित्र पोर्टलवर आपल्या संस्थेतील शिक्षक पदभरतीची माहिती देण्याचं आवाहन करण्यात आलंय. शासन पत्र १० सप्टेंबर २०२४ अन्वये दुसऱ्या टप्प्यातही जिल्हा परिषदेकडेही उर्वरित १० टक्के रिक्त पदे, पहिल्या फेरीतील अपात्र, गैरहजर, रुजू न झालेले उमेदवार, तसेच अन्य व्यवस्थापनातील रिक्त जागा, इत्यादी बाबी विचारात घेऊन जाहिरात द्यावयाची आहे.

## केवायसी झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान द्या - थावरे
### अन्यथा आंदोलन करणार-भाई थावरे

माजलगाव-प्रतिनिधी तालुक्यातील शेतकरी आस्मानी, सुल्तांनी संकटामुळे मेटाकुटीस आला असुन सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीचे अनुदान जिल्हाधिकारी कार्यालयात पडुन आहे. तालुक्यातील बहुतांशी शेतक-यांनी केवासयी केली असुन अद्यापही त्यांना पैसे मिळत नाहीत. त्यामुळे हे अनुदान तात्काळ त्यांच्या खात्यावर जमा करावे अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी नेते गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे. खरिप हंगाम २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने खरिप पिकांचे प्रचंड नुकसान होउन शेतक-यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावुन घेतला. परिणामी उत्पन्नावर मोठा परिणाम झाला असुन अत्यल्प असे उत्पादन शेतक- यांच्या हाती आले आहे. त्यातही शेतक-यांच्या कापुस, सोयाबीनचे पडलेले दर मात्र जैसे थे असुन कापसाच्या हमीभाव देखील शंभर रूपयांनी कमी करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाने याचा विचार करून कापुस, सोयाबीनची दरवाढ करावी अशी मागणी होत आहे. असे असले तरी अत्यल्प कमी दरात कापुस, सोयाबीनची खरेदी होत असल्याने शेतक-याचे नुकसान होत आहे. त्याचबरोबर खरिप हंगामात सप्टेंबर महिण्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीने कपाशी, सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नुकसान भरपाई पोटी शासनाने निधी मंजुर केलेला असुन हा निधी जिल्हाधिकारी कार्यालयात आलेला आहे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासनास हा निधी मंजुर वाटप करण्यास वेळ नाही. तालुक्यातील बहुतांशी शेतक-यांनी केवायसी करून १० ते १२ दिवस उलटले तरीही पैसे खात्यात जमा होत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे तात्काळ हे पैसे जमा करावेत अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तिव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आह

## पाझर तलावात विनापरवाना पाण्याच्या मोटारी टाकल्यास कारवाई-तहसीलदार शेळके



बीड। प्रतिनिधी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी धावज्याची वाडी येथील तलावास भेट दिली . यावेळी त्यांनी पाझर तलावात विनापारवाना मोटार टाकून पाण्याचा उपसा केल्यास कारवाई करण्यात करण्यात येईल असा इशारा दिला. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व बीडच्या उपविगीय अधिकारी कविता जाधव यांच्या समन्वयाने सदरची भेट दिली. धावज्याची वाडीच्या सरपंच सोनाली काटकर यांनी तहसीलदार यांना पत्र लिहून या पाझर तलावात धावज्याची वाडी , खर्डेवाडी, तांदळ्याची वाडी या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी असून तलावाच्या आजूबाजूचे शेतकरी विनापरवाना तलावात मोटारी टाकुन उपसा करत आहेत , अशा प्रकारची तक्रार दिली होती . विनापरवाना पाण्याचा उपसा होऊ नये , उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी स्वतः भेट देण्याची विनंती त्यांनी केली होती . त्या अनुषंगाने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मंडळ अधिकारी दिपाली आघाव , तलाठी अमोल आधापुरे यांच्यासह धावज्याची वाडी येथील नागरिक , माजी सरपंच महेंद्र काटकर , उपसरपंच विष्णू सांगळे , ग्रामपंचायत सदस्य संजीवन काटे , ग्रामसेवक एन डी सुरवसे , विलास काटे , बंडू तांदळे , उमेश तांदळे , श्रीराम तांदळे , प्रदीप काटे, चक्रधर भोसले , लाईनमन पांडुरंग घरत , चंद्रसेन तांदळे , प्रभू सानप यांच्यासह भेट दिली . भेटी दरम्यान शेळके यांच्या निदर्शनास आले की आजूबाजूचे काही शेतकरी तलावाच्या क्षेत्रात पाण्याच्या मोटरी टाकण्याच्या तयारीत आहेत . तहसीलदारांनी आजूबाजूच्या सर्व शेतकऱ्यांना बोलवून समज दिली की विनापरवाना जर कोणी पाण्याची मोटर टाकली आणि त्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली तर त्यांच्यावर संबंधित विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल. उपस्थित शेतकऱ्यांनी सुद्धा आम्ही विनापरवाना अशा प्रकारे पाण्याची मोटर टाकणार नाही, अशी ग्वाही दिली . उपस्थित लाईनमन यांना तहसीलदार यांनी स्पष्ट सूचना दिल्या की कोणालाही विनापरवाना वीज जोडणी देऊ नये . जर कोणी विनापरवाना वीजजोडणी घेतली तर त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करावी कारवाई करावी . यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी असेही सांगितले की शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे अत्यंत सजग आहेत . दुष्काळ अनुदान यादी असो अथवा रस्त्याचे प्रश्न असो सर्वांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचा प्रशासनाचा मानस आहे , असे जिल्हाधिकारी नेहमी नमूद करत असतात . सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीच्या अनुषंगाने जिल्हाभरात बाधित शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड कार्य करण्याची कार्यवाही सुरू असून लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा होईल याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आजच आढावा घेतल्याचे तहसीलदार म्हटले . सार्वजनिक पाण्याच्या स्त्रोतावरून गावोगावी पाण्याची व्यवस्था करण्यात येते त्यासाठी अशा ठिकाणी विहिरी खोदल्या जातात . आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी विनापरवाना पाणी उपसा केला नाही तर उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवणार नाही आणि टँकर लावावे लागणार नाहीत . यासाठी सर्वांनीच प्रशासनाला मदत करणे आवश्यक असल्याचे तलाठी अमोल अधापुरे यांनी यावेळी नमूद केले . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्याचा पदभार घेतल्यापासून शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत त्यांनी संवेदनशीलता दाखविली आहे .

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com